# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३०४/२०२२ दिनांक : ०६/१०/२०२२

## तुळींज पोलीसांनी दाखल गुन्हयातील १०,५०,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल पिडीतांना केला परत.

तुळींज पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या विविध गुन्हयांतील आरोपीतांकडून जप्त करण्यात आलेले ९,००,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने तसेच गहाळ झालेले १,५०,०००/- रुपये किंमतीचे २० मोबाईल हॅन्डसेट असा एकूण १०,५०,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तायलयाचे दुसऱ्या वर्धापन दिनाचे औचीत्य साधुन श्री पंकज शिरसाठ, सहा. पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे हस्ते फिर्यादी व पिडीत यांना परत करण्यात आला. फिर्यादी व तक्रारदार यांच्या चोरीस गेलेल्या तसेच गहाळ झालेल्या किंमती वस्तू पोलीसांचे मार्फतीने परत मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

सदर मुद्देमाल परतीच्या कार्यक्रमाचेवेळी श्री. पंकज शिरसाठ, सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र कांबळे, सपोनिरी /एम. डी. म्हात्रे, पोउनिरी/ बी. एस. बांदल, सफौ/ एस. पी. सुतनासे, पोहवा/ ए. आर. शिंदे, ए. एस. मोरे, पो.ना/ यु. जे. वरठा, पो.अं./ए. एम. जमादार, व्ही. के. राऊत व आय. जी. छपरीबन, पांडूरंग केंद्रे असे उपस्थित होते





----ooo----